# विभागीय आयुक्त कार्यालय, विधानभवन, पुणे विभाग, पुणे-०१
# मागासवर्ग कक्ष

bccell1@gmail.com दुरध्वनी:(०२०)२६३६१०३२

क्र. मावक-२/कावि- ८६८ /२०२५

दिनांक: २७/०६/२०२५

**प्रति,**

कार्यालय प्रमुख / तथा नियुक्ती प्राधिकारी, पुणे विभाग, (पुणे/सोलापूर/कोल्हापूर/सांगली/सातारा)

१. सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालय,
२. विद्यापीठे (पुणे, सोलापूर, कोल्हापूर)
३. सर्व नियुक्ती प्राधिकारी / मान्यता प्राधिकारी, खाजगी शैक्षणिक संस्था

**विषय: बिंदूनामावली पडताळणी बाबत.**

**संदर्भ:** १. इकडील पत्र क्र. मावक/वशी/२०९/२०१७ दि. २८/२/२०१७
२. शासन पत्र क्र. बीसीसी-२०१८/प्र.क्र.२०० A/१६ ब, दि १९ एप्रिल, २०१८
३. शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०२५/प्र.क्र.२७/का.१२(सेवा) दि. ०९ जून, २०२५

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्र क्र १ नुसार विभागीय आयुक्तांच्या अधिपत्याखाली मागासवर्ग कक्षाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या प्रत्येक कार्यालयाची ३ वर्षातून किमान एकदा तरी बिंदू नामावलीच्या संदर्भात तपासणी करणे आवश्यक आहे. तसेच, संदर्भ क्र.२ अन्वये बिंदूनामावली तपासणी केलेनंतरही कार्यरत कर्मचाऱ्यांच्या संख्येमध्ये स्वेच्छानिवृत्ती, सेवानिवृत्ती, राजीनामा, बढती बदली, मृत्यु इत्यादी विविध कारणास्तव बदल होत असतात. अशा परिस्थितीत अनुशेष सतत बदलत असतो. मात्र मागासवर्ग कक्ष, कार्यालयाने रोष्टर पडताळणी करुन आवश्यक आरक्षण निश्चित करुन दिलेले असलेने, तीन वर्षापर्यंत कार्यरत कर्मचाऱ्यांनुसार बदलत गेलेला अनुशेष नियमानुसार भरणे अपेक्षित असते. मात्र काही कार्यालये नियमानुसार ३ वर्षातून किमान एकदा तरी बिंदू नामावली तपासणी न करता, भरती केलेनंतर व बदली नंतर पदे रिक्त झालेस बिंदूनामावली नोंदवही पडताळणीसाठी सादर करतात.

वरील सर्व बाबींचा विचार करता संदर्भ क्र. १ व २ नुसार उक्त विहित मुदतीनंतर (३ वर्ष) अथवा दरम्यान मंजुर पदांच्या संख्येत वाढ/घट झाल्यास रिक्त पदे झालेनंतर भरती करणेपूर्वी अथवा सेवाप्रवेश नियमात बदल झाल्यास विहीत मुदतीपुर्वी नोंदवहीची तपासणी करुन घेणे आवश्यक राहील. तसेच, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०२५/प्र.क्र.२७/का.१२(सेवा) दि. ०९ जून, २०२५ अन्वये सेवाविषयक बाबींच्या अनुषंगाने १५०

दिवसांचा सेवाकर्मी कार्यक्रम राबविण्यात येत असून शासन निर्णयातील विवरणपत्र क्र. ३, मुद्दा क्र. ०६ अन्वये बिंदु नामावली प्रमाणीकरणासाठी १० गुणांकन देण्यात आले आहे. तरी, सहाय्यक आयुक्त, मागासवर्ग कक्ष, कार्यालयाकडे बिंदू नामावली तपासणीसाठी सादर करावी. तसेच बिंदूनामावलीची तपासणी करणेबाबत आपल्या अधिनस्त सर्व कार्यालयांना कळविणेत यावे.

**(डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, भा.प्र.से.)**
**विभागीय आयुक्त,**
**पुणे विभाग पुणे**